REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# रेखा बैजल यांचे मराठी कथाविश्वात स्थान

प्रा. मनीषा व. नलगे
संशोधीका , रा. ल. वि. वि सावरगावं.

## प्रस्तावना :



साठोत्तरी काळात मराठी वाङ्मयात विविध प्रवाह निर्माण झाले व मराठी वाङ्मयाचा कायापालट झाला. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, आदिवासी, बाल विज्ञानवादी अशा विविध साहित्य प्रवाहामुळे मराठी साहित्य अधिक सकस व समृद्ध झाले. या काळात सरीता पत्की, जोत्स्ना देवधर, प्रतिभा इंगोले, सानिया, अनुराधा वैद्य इ. लेखिकांनी मराठी कथाक्षेत्रात लक्षणिय विकास साधला. या नामावलीत रेखा बैजलांनाही मानाचे स्थान प्राप्त व्हावे अशी त्यांची वाङमयीन कामगीरी अतुलनीय आहे.

रेखा बैजल यांचे लेखन बहुगामी, बहुआयामी व विविधतेने नटलेले आहे. मराठी वाङ्मयाच्या विविध साहित्य प्रवाहातून त्यांची लेखणी लिलया संचार करते. त्यांनी साधारणत: १९७० पासून कथा लेखनाला प्रारंभ केला. 'मानस' हा त्यांचा पहिला कथासंग्रह असून आजपर्यत त्यांचे १३ कथासंग्रह प्रकाशित झालेले आहे. त्यांच्या प्रत्येक कथासंग्रहाचे स्वरूप विविधात्मक आहे. त्यांनी समाजजीवनातील विविध अनुभव कथारूपात शब्दबद्ध केले. त्यांची कथा नागरी व ग्रामीण भागातील मध्यमवर्गीयांचे सुख—दु:ख रेखाटीत नाही तर पांढरपेशी वर्गापासून भटका समाज, वंचीत घटक व स्त्री जीवनाचे सुख—दु:खअधोरेखीत करते. शिवाय विज्ञानवादी रचनेतून समाजास सजगतेचा इशारा देते. अर्थात रेखा बैजलांची अनुभव घेण्याची पद्धती नावीन्यपूर्ण आहे. मराठी कथालेखनातील बदलत्या वृत्ती प्रवृत्तींना सामोरे जाणारी व नव्या प्रवृत्तीना पृष्ट करणारी एक संवेदनशील व तरल मनाची कथालेखिका म्हणून त्यांचे कथावाङ्मयातील स्थान निश्चितच वरच्या दर्जाचे आहे. म्हणूनच वृषाली आठल्ये 'एक कोमल मनाच्या' लेखिका म्हणून त्यांचा गौरव करतात.

साठोत्तरी कालखंडातील कथांचा विचार करता रेखा बैजल यांच्या कथा नावीण्यपूर्ण आशयाने ओतप्रोत भरलेल्या असून स्वतंत्र ठसा उमटविणाऱ्या आहे. त्यांची कथा कोणताही लेखादर्श नसलेली मुक्त अशी आहे. अंतर्मुख होऊनच त्या कथेकडे पाहतात. विचारांची व तत्त्वज्ञानाची बैठक त्यांच्या कथेला लाभली आहे. मानवी जीवनाकडे त्या अतिशय शोधक सहानुभूतीने पाहत असल्यामुळे त्यांच्या कथेतील जाणिवा तीव्र झालेल्या आहे.

वासुदेव मुलाटेच्या मतानुसार कुठल्याही लेखकाला आपल्या समकालीन वास्तवामध्ये मुळ रोवूनच उभं राहाव लागतं. रेखा बैजल याला अपवाद नाही त्यांच्या कथांना मराठवाडयाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. मराठवाडयातील नागरी व ग्रामीण जीवनाचा शोध घेत असतांना त्यांच्या कथा त्यातील कारूण्य शोधतात व त्यातील विसंगतीचा शोध घेतात. 'मानस', 'अस्तित्व' 'संध्याकाळ', 'सल','नभाचिया मानसी' इ. कथा याबाबतीत सखोल विचार व्यक्त करणाऱ्या आहे. शिवाय मराठवाडयाचे सामाजिक वास्तव सरंजामशाहीच्या प्रभावाने अधिकाधीक व्यापलेले असले तरी मानसिक गूलामगीरी, दुर्बलता, स्त्रीदास्य,

अविकसितता, परंपरेचा पगडा, आत्मविश्वासाचा अभाव या गोष्टी मराठवाडयात प्रामुख्याने आढळून येतात. १९६० नंतर त्यात थोडा बदल झाला तरी नागरी व ग्रामीण लोकांच्या समस्या पूर्णपणे सुटल्या नाही. अजूनही हा समाज दु:ख, दैन्य, दारिद्रय, विषमता, बेकारी या संकटांना तोंड देत आहे. रेखा बैजलांच्या मनाने या गोष्टी अचूकतेने वेधल्या व त्यावर लेखणीरूपाने प्रकाश टाकला.

रेखा बैजलांच्या कथा जीवनानुभूतीने नटल्या आहे. अर्थात त्यांच्या सामाजिक व संवेदनशील मनाचा प्रत्यय त्यांच्या अनेक कथातून येतो. लढा, केवळ एक रात्र, आत्मदहन, कृतार्थ, नातं, अगतिक, ओॲसीस, मेघ वळवाचे इ. कथाद्वारे त्यांनी वर्तमानकालीन वास्तव परिस्थितीवर प्रकाश टाकला. म्हणजेच समाजात जे जाणवले, ज्यांच्या योगाने त्यांचे अंतकरण हलले ते अनुभव त्यांनी कथांतून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या कथातून समाजाच्या अंतर्मनातील संघर्षाचा बोध होतो. त्यांच्या लेखनाला चिंतनशिलतेची जोड आहे. त्यांच्या सामाजिक कथातून दिसणारा जिव्हाळा व आंतरीक तळमळ इतकी प्रभावी आहे की त्यामुळे त्यांचे मानवतेसाठी तडफडणारे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबीत होते. निव्वळ वर्णनावर त्यांचा विश्वास नाही. अधिकाधिक संवादातून त्यांचं कथानक फुलत जाते. म्हणून अनेकांना त्यांच्या लिखाणात नाट्य आढळते या लेखनवैशिष्टयामुळेही मराठी वाङ्मयात त्यांना वरचे स्थान प्राप्त होते.

सामाजिक न्यायातून वा कौटुंबिक जाचातून निर्माण झालेली स्त्रीची दु:ख या काळातील लेखिकांनी चितारली परंतु रेखा बैजल मात्र यापुढे जाऊन सामाजिक व आर्थिकदृष्टया स्वतंत्र झालेल्या स्त्रीच्या जीवनातील नव्या समस्यांना कथेचा विषय बनवितात. स्त्रीच्या बाहय जीवनाबरोबरच तिच्या अंतर्जिवनात त्यांनी प्रवेश करून स्त्रियांच्या अंतरंगातील विविध सूक्ष्म छटा स्त्रीवादी जाणिवेतून कथारूपात व्यक्त केलेल्या दिसतात. तिच्या अंतरंगातील सखोल गाभ्यात व सूक्ष्म मनात शिरकाव करून एक व्यक्ती म्हणूनच तिच्या अस्तित्त्वाचा, सुख—दु:खाच्या जाणिवेचा आत्मशोध कथारूपात समाजापुढे आणतात यामुळे त्यांच्या कथा पाल्हाळिक व बोजड न वाटता मराठी साहित्यात विशेष उंची गाढतात.

रेखा बैजलांच्या कथाप्रांताचा विचार करता त्यांनी कथेच्या प्रांतात चांगलीच भर घातलेली आहे. त्यांनी विविध व्यावसायीक क्षेत्राचा आढावा व त्यातील चांगल्या वाईट, गोष्टीवर प्रकाश टाकला आहे. सैनीकी जीवन, गुप्तचर विभाग, राजकिय क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, वृत्तपत्र व्यवसाय तसेच उच्चभ्रू वर्गाचे जीवन व त्यांचे प्रश्न कथारूपातून हाताळले आहे. त्यांनी मानवी वेदनांची विविध रूपे जीवनशैलीमधून कथन केली आहे. त्याचबरोबर मानवी जीवनातील सुख—दु:ख, कौटुंबिक ताणतणाव, स्त्री समस्या तळागाळातील सामाजिक परिस्थिती योग्य रीतीने रेखाटली आहे. शिवाय त्यांच्या कथेचा आशय इतका बोलका आणि परिणामकारक आहे की तो आजच्या सुजाण वाचकासमोर प्रेरणादायीच ठरेल.

रेखा बैजल यांच्या कथेच्या मुख्य प्रवाहामध्ये ग्रामीणकथेची एक धारा आहे 'शिवार', 'दुष्काळ' या कथासंग्रहातील विविध कथा ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकते व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर पाटील, आनंद यादव यांच्याप्रमाणे रेखाजींच्या ग्रामीण कथा ग्रामीण साहित्याला समृध्द करतात. त्यांच्या ग्रामीण कथेतून सृष्ट—दृष्ट भोळीभाबडी, दिलदार, साधीसुधी अशा विविध स्वभावाची पात्रे समोर येतात. त्याचबरोबर पाऊस हे देखील एक महत्त्वाचा घटक आहे. पावसाच्या येण्या न येण्यातून निर्माण होणाऱ्या सुखदु:खाचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या कथातून येते. त्यांच्या ग्रामीण कथा ग्रामीण लोकांविषयी आपुलकी, प्रेमभावना निर्माण करण्यास मदत करते. आज शहरी व ग्रामीण जीवन यात मोठी तफावत दिसून येते. शहरी संस्कृतीला कवटाळणारे लोक ग्रामीणांना तुच्छ लेखू लागतात. परंतु रेखाजींनी 'शिवार' कथासंग्रहातील विविध कथातून घडविलेले ग्रामीण संस्कृतीचे, लोकांच्या स्वभावछटांचे चित्रण ही तफावत दूर करण्यास नक्कीच मदत करेल व ग्रामीणांना सन्मान मिळवून देईल. त्यांच्या अशा रेखाटणामुळे मराठी साहित्यात त्यांचे वेगळेपण सिध्द होते.

रेखा बैजलांचे लिखाण एकांगी नसून विविधात्मक आहे. त्यांना सगळयाच क्षेत्राचे आकर्षन दिसते. शिवाय त्यांची कल्पनाशक्ती उत्तुंग आहे. त्यामुळे विज्ञानकथांचाही प्रवाह त्यांच्या साहित्यात आलेला आहे. विज्ञानकथा लिहिणे लेखकांसाठी आव्हान असते. विचारांची भक्कम चौकट असणाऱ्या रेखाजी त्या आव्हानाला खऱ्या उतरलेल्या दिसतात. त्यांनी 'विज्ञानकथा', 'क्लोन', 'किडनपींग', 'अंतरिक्षातील शेजारी' इ. विज्ञान कथा संग्रहात दर्जेदार कथा लिहून विज्ञानकथेचे दालन समृध्द केलेले दिसते. त्यांच्या विज्ञानकथाबाबत मंदा खांडगे म्हणतात, ''रेखा बैजल यांच्या कथांमध्ये वैज्ञानिक संशोधनातील गूढता,

साहसी प्रयोग, त्यातील ताणतणाव भीती यातून वाचकांची उत्सुकता शेवटपर्यंत कायम राखली जाते.'' अर्थात विज्ञानयुगात वावरणाऱ्या माणसांच्या सर्वांगीण जीवनावर विज्ञानाचे परिणाम होतात व त्यानुरूप होणाऱ्या मानवी वर्तन, पास्परसंबंध व त्यांचे चित्रण त्यांच्या विज्ञानकथेत येते. अर्थात रेखाजींनी विज्ञान न जाणणाऱ्या वाचकाला त्यांचे आकलन होऊ शकेल अशा साध्या सोप्या भाषेत वैज्ञानिक संकल्पना दृग्गोचर केल्या. यादृष्टीने सुध्दा तत्कालीन कथासाहित्यात त्यांच्या वेगळेपणाचा ठसा उमटतो.

रेखा बैजल हया आजच्या काळातील सृजनशील लेखिका असलेल्या दिसतात कधी कधी मानवी जीवनानुभवाकडे त्या पारंपारिक दृष्टिकोनातून बघत असल्या तरी त्यांना लाभलेली बैठक मात्र एका आधुनिक मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय अभ्यासकाची असलेली दिसते.

समलिंगी, समधर्मी व्यक्तीशी संवाद साधणे सरळ असले तरी भिन्नलिंगी व्यक्तीचे मनोविश्व मांडणे एक आव्हान असते. अर्थात ही बाब अचूकतेने हेरून पुरुषी विचार त्यांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन इ. ची मांडणी कलात्मकतेने केली आहे. त्यांचे हे कसब वाखाणण्याजोगे आहे.

रेखा बैजल यांचे साहित्य प्रामुख्याने ग्रामीण व नागरी संकल्पनामध्ये मोडत असले तरी विशिष्ट बाबीवर लक्ष केद्रीत न करता त्यांनी चौफेर लेखन केलेले दिसते. त्यामुळेच त्यांचा सर्वांगीण लेखन करणाऱ्या लेखिका म्हणून उल्लेख करता येतो.

एकंदरीत रेखा बैजलांचे कथाविश्व व्यापक व विशाल असून समाजाच्या अनेक अंगाना, अनुभवाच्या अनेकपातळयांना छेदून जाते. त्या मानवी जीवनाकडे चिकित्सकपणे पाहतात. तसेच तटस्थ व अलीप्त राहून लेखन करतात. प्रतिमा, प्रतिकांचा सोस नसलेली प्रवाही भाषा, सूक्ष्मवर्णन, चटकदार बोलके संवाद, कथेची घट्ट वीण ही त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये असून त्यांच्या कथा अतिशय तरल, उत्कट आणि मानवी मनावर खोल ठसा उमटविणाऱ्या आहे. अर्थात समाजातील एक सर्जनशील कार्य आणि स्वतंत्र कलात्मक निर्मिती असे दुहेरी मूल्य साहित्याचे असते. या सर्व निकषावर त्यांचे लेखन उतरले. दैवी देणगी वापरून मनोरंजन विचारप्रवर्तन व भावनाजागृती यांनी संयुक्त लेखन करून समाजाला अनुभव समृद्धी देण्याचे कार्य त्यांची लेखणी करत आहे.

## संदर्भग्रंथ :—

१) इंदुमती शेवडे : 'मराठी कथा उगम आणि विकास', मुंबई १९७३
२) म.ना. अदवंत : 'प्रदक्षिणा खंड १८४० ते १९६०', कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, १९८०
३) अविनाश डोळस : 'प्रतिष्ठान' मे—जुन—जुलै—ऑगस्ट,ऑगस्ट १९९७ अंक ३
४) डॉ. मंदा खांडगे : 'स्त्री साहित्याचा मागोवा' खंड ४, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, पुणे
५) वासुदेव मुलाटे :संपा—मराठयांची कथा, कथा समीक्षा विशेषांक, औरंगाबाद १९९४
६) दादासाहेब गिन्हे : 'रेखा बैजल : वाङमय दर्शन', साकेत प्रकाशन, औरंगाबाद २०१४